सकाळ



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभात प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले व त्यांचे सहकारी यांचा सत्कार करीत असताना कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद बी. शिंदे, शिवाजी विद्यापीठाचे बीसीयुडी डायरेक्टर डी. आर. मोरे व इतर.**

# डीकेटीईची गुणवत्ता शिष्यवृत्तीत भरारी

## शिवाजी विद्यापीठात प्रा. कडोले यांचा सत्कार

इचलकरजी, ता ६ : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती २०१७-२०१८ शैक्षणिक वर्षामध्ये डीकेटीईच्या टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटने अभियांत्रिकी विद्याशाखातून निमशहरी गटातून प्रथम क्रमांक मिळविला. याबद्दल कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते इन्स्टिट्यूटचा गुणवत्ता प्राप्त महाविद्यालय म्हणून सत्कार झाला. संस्थेचे डायरेक्टर प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले, डेप्युटी डायरेक्टर प्रशासकीय, प्रा. डॉ. यु. जे. पाटील, डेप्युटी डायरेक्टर शैक्षणिक प्रा. डॉ. सौ. एल. एस. आडमुठे यांनी सत्कार स्वीकारला.

विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागात उच्च शिक्षण घेणारा विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून त्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती सुरू केली आहे. विद्यापीठात झालेल्या गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ गटनिहाय गुणवत्ताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या सत्कार समारंभाप्रसंगी अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद बी. शिंदे होते.

डॉ. कडोले म्हणाले, ''निमशहरी विभागात डीकेटीईचे सर्वाधिक विद्यार्थी येऊन डीकेटीईने शैक्षणिक गुणवत्ता शिवाजी विद्यापीठात सिद्ध केलेली आहे.''

संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, सचिव डॉ. सपना आवाडे व सर्व विश्वस्त यांनी प्राचार्य डॉ. कडोले व सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.

**डीकेटीईने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकास वाढीसाठी आणि त्यांच्या संशोधनात्मक वृत्तीला चालना देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. डीकेटीईमध्ये गेली छत्तीस वर्षे विद्यार्थीकेंद्रित दृष्टी ठेवून तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापकांद्वारे हे कार्य केले जाते. त्याचीच परिणती डीकेटीईच्या सर्वाधिक विद्यार्थ्यांनी ही शिष्यवृत्ती पटकावली.**
**- डॉ. पी. व्ही. कडोले,**
डेप्युटी डायरेक्टर डीकेटीई इन्स्टिट्यूट

Kolhapur, Main
07/09/2018 Page No. 7

7 SEP 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवत्ता शिष्यवृत्तीत डीकेटीईची आघाडी

## डायरेक्टर प्रा.डॉ. पी. व्ही. कडोले यांचा सत्कार : शिवाजी विद्यापीठात कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी
इचलकरंजी

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षामध्ये डीकेटीईच्या टेक्स्टाईल अ‍ॅण्ड इंजिनिअरींग इन्स्टिट्यूटने अभियांत्रिकी विद्याशाखातून निमशहरी गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते डीकेटीईच्या टेक्स्टाईल अ‍ॅण्ड इंजिनिअरींग इन्स्टिट्यूटचा गुणवत्ता प्राप्त महाविद्यालय म्हणून सत्कार करण्यात आला. हा सत्कार संस्थेचे डायरेक्टर प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले, डेप्युटी डायरेक्टर प्रशासकीय, प्रा. डॉ. यु. जे. पाटील, डेप्युटी डायरेक्टर शैक्षणिक प्रा. डॉ. सौ. एल. एस. आडमुठे यांनी स्वीकारला.

विद्यापीठाच्या विविध पदव्युतर अधिविभागात उच्च शिक्षण घेणा-या गुणवत्ताधारक विद्यार्थी / विद्यार्थ्यांनी शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून त्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीची' निर्मिती केली आहे. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या गुणवत्ता शिष्यवुती गुणगौरव समारंभ शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ गटनिहाय गुणवत्ताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या सत्कार समारंभप्रसंगी अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे होते.



कोल्हापूर - शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित गुणवत्ता शिष्यवुत्ती गुणगौरव समारंभात प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले व त्यांचे सहकारी यांचा सत्कार करताना कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे. सोबत शिवाजी विद्यापीठाचे बीसीयुडी डायरेक्टर, डी. आर. मोरे व अन्य मान्यवर.

सदर सत्कारप्रसंगी डॉ. कडोले म्हणाले, ज्ञान संस्कारातील प्रोत्साहनाला शिष्यवृत्ती हे माध्यम आहे व या शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहकार्य व प्रेरित करणे आणि आत्मविश्वास वाढविणे हा उद्देश आहे. डीकेटीईने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकास वाढीसाठी आणि त्यांच्या संशोधनात्मक वृतीला चालना देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. डीकेटीईमध्ये गेली छत्तीस वर्षे विद्यार्थी केंद्रित दृष्टी ठेवून तज्ञ व अनुभवी प्राध्यापकांद्वारे हे कार्य केले जाते. त्याचीच परीणीती डीकेटीईच्या सर्वाधिक विद्यार्थ्यांनी ही शिष्यवृत्ती पटकावली यात झाली आहे. निमशहरी विभागात डीकेटीईचे सर्वाधिक विद्यार्थी येवून डीकेटीईने आपली शैक्षणिक गुणवत्ता शिवाजी विद्यापीठात सिद्ध केलेली आहे.

विद्यापीठ पातळीवर डीकेटीई संस्थेने मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, सचिव डॉ सपना आवाडे व सर्व विश्वस्त यांनी प्राचार्य डॉ. कडोले व सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

लोकमत

# विद्यापीठात 'पर्यावरणपूरक गणेशमूर्ती'बाबत मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव' कार्यशाळा गुरुवारी घेतली. त्यात पर्यावरणपूरक घटकांचा वापर करून गणेशमूर्ती तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले.

प्लास्टर ऑफ पॅरिस व रासायनिक रंगांचा वापर टाळून पर्यावरणपूरक घटकांचा वापर करून गणेशमूर्ती तयार करता येऊ शकते, हा कार्यशाळेचा उद्देश होता. यावेळी मारुती पाटील, उदय पाटील, रघुनाथ श्रृंगारे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस पर्यावरणशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.

Hello Kolhapur
Page No. 2 Sep 07, 2018
Powered by: erelego.com

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात पालक मेळावा


**कोल्हापूर :** आजच्या स्पर्धेच्या युगात शिक्षण प्रक्रियेत आमूलाग्र बदल होऊ लागला आहे. याची पालकांना माहिती असावी, विज्ञानाच्या युगात जग जवळ येऊ लागले आहे. तसेच आम्ही असा विश्वास ठेवतो की पालकांचा मुलांच्या जीवनावर प्रभाव असतो, म्हणूनच आजच्या काळात तरुण पिढीला घडविण्यासाठी महाविद्यालयात पालक मेळावा गरजेचा असल्याचा सूर शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाने आयोजित केलेल्या मेळाव्यात व्यक्त झाला. यावेळी माहिती तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, समन्वय डॉ. ए. के. साहू, शैक्षणिक समन्वयक डॉ. पी. डी. पाटील, तंत्रज्ञान अधिविभागाचे प्लेसमेंट सेलप्रमुख डॉ. एस. बी. सादळे, एम. एस. साळुंखे, एम. एम. मोरे आदी उपस्थित होते.

# कृत्रिम बुद्धिमत्तेतून स्थित्यंतरे शक्य : डॉ. पारिजात

## पत्रकारिता विभागात शिक्षक दिन उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कृत्रिम बुद्धिमत्तेने अनेक आव्हाने उभी राहली असून, येत्या काळात यातून अनेक स्थित्यंतरे होतील, असे मत सायबरचे डॉ. राजेंद्र पारिजात यांनी व्यक्त केले.



डॉ. राजेंद्र पारिजात

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागात शिक्षक दिनानिमित्त आयोजित समारंभात 'कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. निशा पवार होत्या. यावेळी डॉ. श्रीहरी देशपांडे आणि डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे उपस्थित होते.

डॉ. पारिजात म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता मानवानेच तयार केली असून, आज ती मानवापुढे आव्हान बनू पाहत आहे. जैवविज्ञानाच्या पलीकडे जाऊन ती काम करत आहे. आरोग्यासारख्या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे अनेक चांगली कामे होत आहेत. जगभरात बुद्धिमत्तेचा झपाट्याने विकास झाला; परंतु या बुद्धिमत्तेचा वापर सकारात्मक पद्धतीने न झाल्यास ती मानवी अस्तित्वाला धोकाही ठरू शकते.' डॉ. पारिजात यांचे स्वागत संशोधक विद्यार्थी चंद्रशेखर वानखेडे यांनी केले. यावेळी पत्रकारिता विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ

# तंत्रज्ञानापुरते न राहता बुद्धीच्या कक्षा वाढवा

## डॉ. सुभाष देसाई; दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमाला

कोल्हापूर, ता. ६ : 'आजच्या तरुणांपुढे रोबोटिक आव्हाने उभी आहेत, त्यामुळे तरुणांनी स्वत:ला केवळ तंत्रज्ञानापुरते न राहता बुद्धीच्या कक्षा वाढविणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुभाष देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात झालेल्या दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमालेत 'दत्ताबाळांचे जीवनवकार्य' विषयावरते बोलत होते.

विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार अध्यक्षस्थानी होते. अर्थशास्त्र विभागाच्या सेमिनारहॉलमध्ये व्याख्यान झाले.

डॉ. देसाई म्हणाले, 'जीवनात यशस्वी होण्यासाठी  विचारांची पायाभरणी चांगली असली पाहिजे. तरुण पिढीने धर्म व विज्ञान यांबाबत तौलनिक चर्चा केली पाहिजे. त्याचात्यांना निश्चितच लाभ होईल. बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर व प्राचार्य एम.आर.देसाई यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात सुमारेपाचशे प्राथमिक शाळा काढल्या. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव प्राचार्य देसाई यांच्यावर होता.तेच संस्कार दत्ताबाळांवर होते.

'डॉ.पवार म्हणाले,'भारतात १८१८ ला मध्यमवर्गीयांत आधुनिकता उदयास येण्यास सुरूवात होत होती. त्यावेळेस, मी कोणआहे?,असा प्रश्न भारतीयांनी स्वत:ला विचारण्यास सुरूवात केली.त्यापद्धतीने आपण कोणत्याही टोकाला,निष्कर्षाला न जाता नेमकेपणाने दत्ताबाळ यांच्याबद्दल विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा.

डॉ. रवींद्र भणगे यांनी प्रास्ताविक केले. सचिन चव्हाण यांनी आभार मानले.